९०/२१८

जा.क्र.शिउसं/प्राशि २/खाप्राशा-मान्यता/पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे १. यांचे कार्यालय.
दिनांक - 18 JAN 2013

प्रति,

शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे

विषय :- मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढ / अतिरिक्त वर्ग / तुकडया मंजूर करणेबाबत

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.प्राशातु १११२/(२८६/२०१२)/प्राशि ३ दि. ८/१०/२०१२
२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक),शि.सं.म.रा.पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा/नैसर्गिकवाढ/२०१०-२०११/ड-५१२(अ)/७२६४ दि. २२/१०/२०१२.

उपरोक्त विषयाबाबत आपल्या कार्यालयाकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेच्या नैसर्गिक वाढ / अतिरिक्त वर्ग / तुकडयाना विनाअनुदान तत्वावर मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर शाळेस खालील अटीच्या अधिन राहून वर्गास मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे शाळेचे नाव | माध्यम | मंजूर करावयाचा वर्ग /तुकडी | मंजूर करावयाचे वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रियदर्शनी शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा, अप्पर बिबवेवाडी, पुणे | मराठी | इयत्ता ३ री ते इ. ७ वी (दुसरी) | २००२ पासून इ. ३ री व पुढे नैसर्गिक वाढीने | विना अनुदान तत्वावर |
| २. | ज्ञानेश प्रायमरी स्कूल, बालाजीनगर, धनकवडी, पुणे ४३ | मराठी | इयत्ता ७ वी (दुसरी) | सन २००८ पासून | विना अनुदान तत्वावर |
| ३. | महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ.दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर, तरडेवस्ती, पुणे | मराठी | इयत्ता ४ थी (२ री व ३ री) | सन २००५-०६ पासून | विना अनुदान तत्वावर |

१. शासनाच्या त्या-त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे या तुकडयांना अनुदान देय राहील.
२. मुल्यांकनानुसार पात्र झाल्यानंतरच या तुकडयांना शासनाच्या त्या-त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे या तुकडयांना अनुदान देय राहील.
३. अनुदान मंजूर होणे हा संस्थेचा हक्क राहणार नाही. अनुदानाच्या उपलब्धतेनुसारच अनुदान देण्यात येईल.
४. मान्यता दिलेल्या उपरोक्त वर्ग / तुकडयांची किमान विद्यार्थी पटसंख्या व हजेरीसंख्या टिकविण्यात यावी.
५. पटसंख्या अथवा हजेरीसंख्या कमी असल्यास तो वर्ग / तुकडी अनुदानासाठी पात्र ठरणार नाही.
६. सदर परिपत्रकातील नैसर्गिक वाढीचे वर्ग / अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देतेवेळी प्राथमिक शाळांना सदरील नैसर्गिक वाढीच्या वर्गाची / अतिरिक्त वर्ग / तुकडयांची खरोखरच गरज आहे किंवा कसे याची खातरजमा करुन त्यानंतरच सदर वर्ग / तुकडया मंजूर कराव्यात
७.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर
१. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक),शि.सं.म.रा.पुणे

प्रत माहितीस्तव
१. मुख्याध्यापक, प्रियदर्शनी शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा, अप्पर बिबवेवाडी, पुणे
२. मुख्याध्यापक, ज्ञानेश प्रायमरी स्कूल, बालाजीनगर, धनकवडी, पुणे ४३
३. मुख्याध्यापक, महाराष्ट्र आरोग्य मंडळ संचलित डॉ.दादा गुजर प्राथमिक विद्यामंदिर, तरडेवस्ती, पुणे